**महाराष्ट्र शासन**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला**
**दूरध्वनी क्र.( ०७२४) २४३१९६०, २४३७०७८, फॅक्स क्र.२४३७०७८**

जा.क्र.शावैमअ/आस्था-१,२/मेस/निविदाप्रक्रिया/ 20/१८.

दिनांक : /१२/२०१८.
1/1/19

## —: जाहिरात :—

या जाहिराती सोबत जोडलेल्या निविदेतील अटी व शर्ती नुसार या वैद्यकीय महाविद्यलयातील परिसरातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहातील खालील प्रमाणे नमुद केलेल्या खानावळी करीता निविदा काढण्यासाठी पात्रता धारक मेस/खानावळ संचालकाकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) मुलांचे वसतीगृह क्र. (१)
२) मुलांचे वसतीगृह क्र. (२)
३) मुलींचे वसतीगृह क्र. (३)
४) मुलींचे वसतीगृह क्र. (४)

**निविदा सादर करीत असतांना निविदा धारकाने खालील अटीं व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे .**

निविदा व्दिलिफाफा पध्दतीत भरणे आवश्यक आहे.

तांत्रीक लिफाफा क्र.१ मध्ये आवश्यक सर्व कागदपत्रे व लिफाफा क्र.२ मध्ये खानावळीचे मासीक दर व अल्पोपहार पदार्थांचे मासीक दर नमुद करण्यात यावे.

१) निविदा धारकाने मागील तीन वर्षाच्या खानावळीचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
२) निविदा धारक हा संस्था,बचत गट अथवा बेरोजगार संघटना निविदा सादर करीत असतील तर त्यांनी मागील तीन वर्षाचे नोंदणी प्रमाणपत्र व लेखा परिक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे. व पुर्वी चालवित असलेल्या खानावळी चे नोंदणी प्रमाणपत्र (रजीष्ट्रेशन सर्टफिकेट) जोडणे आवश्यक राहील
३) निविदा धारकाने पुर्वी चालवित असलेल्या खानावळीवर कोणत्याही प्रकारे कायदेशीर कारवाई झालेली नसावी.
४) नोंदणी शुल्क रु.१००००/- (रुपये दहा हजार फक्त ) रकमेचे राष्ट्रीय बॅंकेचे धनाकर्ष हे, मा.अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अकोला यांच्या नावाने भरणे असणे आवश्यक आहे.
५) विद्यार्थी मेसच्या निविदा अर्जाची किंमत रुपये १०००/- (ना - परतावा ) राहील व सदर रक्कम रोखपाल यांचेकडे भरणा केल्याची पावती घेतल्यास अर्ज देण्यात येईल.
६) निविदा धारकाने मागील तीन आर्थिक वर्षाचे आयकर विवरण पत्र सोबत जोडावे.
७) विद्यार्थी मेसचे इमारतीचे मासीक भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी ठरवुन दिलेल्या चटई क्षेत्रापमाणे राहील व ते आपणांस मान्य असल्याचे शपथपत्र देणे बंधनकारक राहील.
८) पहिला लिफाफा उघडण्यात येईल व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता पुर्ण करीत असल्यास दुसरा लिफाफा उघडण्यात येईल.

**दुस-या लिफाफयात खालील दस्तऐवज असावेत.**

१) निविदा धारकाने नमुन्यातील अर्ज सादर करणे.
२) निविदा धारकाने मासीक खानावळीचे दर व अल्पोपहाराचे दराचा तक्ता सादर करणे आवश्यक आहे.
३) वरील दोन्ही लिफाफे मोहोरबंद करावे व पहिल्या लिफाफयावर तांत्रिक लिफाफा क्र.१ या मध्ये आवश्यक सर्व कागदपत्रे व दुस-या लिफाफयावर लिफाफा क्र.२ यामध्ये फक्त दर नमुद करावे.तसेच दोन्ही लिफाफे एक मोठया लिफाफयात सिलबंद करावे.त्यावर निविदा धारकाचे नांव व संपुर्ण पत्ता,दुरध्वनी कमांक इ. तपशील नमुद करावा.

**(डॉ.राजेश कार्यकर्ते)**
**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**

Mess & CANTEEN 2014

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला.

## जाहिरात.

शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या परिसरातील मुलांचे वस्तीगृहातील दोन व मुलींचे वसतीगृहातील दोन मेस बाबत दोन वर्षाच्या कालावधीकरीता निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेचा नमुना व सोबत जोडावयाची प्रमाणपत्राची सविस्तर माहीती शासकिय वैद्यकीय महाविद्यालय अकोला चे पुढील संकेतस्थळावर http.//www.gmcakola.in दिनांक ०७.०१.२०१९ ते १४.०१.२०१९ या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

अर्ज स्वीकारण्याची अंतिम दिंनाक १५.०१.२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत राहिल. व निविदा हया १५.०१.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता ऊघडण्यात येतील. तरी पात्र निविदा धारकांनी वरील संकेतस्थळावर संबंधीत माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

**टिपः- प्रत्येक खानावळी करीता स्वतंत्र्य निविदा भरण्यात यावी.**

Sd/-
**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**अकोला.**

Scanned by CamScanner